“मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना” सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत. शुध्दीपत्रक

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२/(E १४५२७१०)/पाणंद रस्ते**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: २५ मार्च, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५
२. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. ०७.०१.२०२६
३. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १८.०२.२०२६

**प्रस्तावना -**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. या हेतूने राज्य शासनाने "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दिनांक ०२.०१.२०२६ रोजी नागपूर येथे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये उपस्थित मुद्दांच्या अनुषंगाने व मा.राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार) यांच्याकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**शासन शुध्दीपत्रक -**

| अ.क्र. | दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा | शासन शुध्दीपत्रक |
|---|---|---|
| १. | ९. अतिक्रमणाबाबत :- गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेले व शासकीय जागेत असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीला तहसीलदार यांनी सदर अतिक्रमण ७ दिवसात | ९. अतिक्रमणाबाबत :- गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेले व शासकीय जागेत असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीला तहसीलदार यांनी सदर अतिक्रमण ७ |

| | | |
|---|---|---|
| | काढण्याबाबत नोटीस द्यावी व अतिक्रमण करणाऱ्याने जर अतिक्रमण काढले नाही तर सदर अतिक्रमण शासन स्तरावरून तहसीलदार यांच्यामार्फत काढण्यात येईल . | दिवसात काढण्याबाबत नोटीस द्यावी व अतिक्रमण करणाऱ्याने जर अतिक्रमण काढले नाही तर सदर अतिक्रमण शासन स्तरावरून तहसीलदार यांच्यामार्फत काढण्यात येईल. ज्या ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ अन्वयेकिंवा मामलेदार अधिनियम, १९०६ च्या कलम ५ अन्वये इतर शेतकऱ्यांचा ये-जा करण्याचा हक्क मान्य करण्यात आला आहे अशा रस्त्यांवर संबंधित शेतक-यास पीक लागवड करता येणार नाही. तसेच सदर रस्त्यांचे नुकसान करणा-यांचे आधार कार्ड व फार्मर आय-डी ५ वर्षांकरीता ब्लॉक करण्यात येईल व शासनाच्या विविध योजनांचे लाभ व कोणतीही शासकीय मदत मिळण्यापासून अपात्र ठरेल. |
| २. | १०. इतर बाबी:-<br>१०) प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही. जे शेतकरी स्वत:हून त्यांची जमीन पाणंद रस्त्याकरीता देतील त्यांनी देण्यात येणा-या जमिनीचे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र / हक्कसोड करणे अनिवार्य राहील. सदर नोंदणीकृत अभिलेखामध्ये लिहुन घेणार म्हणून शासनाच्या वतीने संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोंदणीकृत अभिलेखाची नोंद सदर शेतक-याच्या ७/१२ उता-यावर घेण्यात येईल. (दि.१८.०२.२०२६ रोजीचे शासन शुध्दीपत्रक) या प्रयोजनार्थ शेतक-याने शासनास दिलेली जमीन परत | १०. इतर बाबी:-<br>१०) प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही. जे शेतकरी स्वत:हून त्यांची जमीन पाणंद रस्त्याकरीता देतील त्यांनी देण्यात येणा-या जमिनीचे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र / हक्कसोड करणे अनिवार्य राहील. सदर नोंदणीकृत अभिलेखामध्ये लिहुन घेणार म्हणून शासनाच्या वतीने संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोंदणीकृत अभिलेखाची नोंद सदर शेतक-याच्या ७/१२ उता-यावर घेण्यात येईल. असे नोंदणीकृत दानपत्र /बक्षीसपत्र / |

| | | |
|---|---|---|
| | मागण्याचा/मिळण्याचा सदर शेतक-याला हक्क राहणार नाही. | हक्कसोड पत्र हे शासनाच्या लाभात करण्यात येत असल्याने ते नोंदणीकृत करण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३ नुसार मुद्रांक शुल्क व नोंदणी फी माफ आहे. या प्रयोजनार्थ शेतक-याने शासनास दिलेली जमीन परत मागण्याचा/मिळण्याचा सदर शेतक-याला हक्क राहणार नाही. |
| ३ | दिनांक ०७.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ प्रगतशील शेतकरी निवडण्याची पध्दती खालीलप्रमाणे निश्चित केलेली आहे.<br>२. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ प्रगतशील शेतकरी निवडण्याची पध्दत:-<br>अ) विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचे सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी (SDO) यांनी जिल्हा अधीक्षक कृषी दिनांक ०७.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये कारी यांचेकडून प्रगतशील शेतकऱ्यांची नावे मागवून घ्यावीत.<br>आ) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेकडून प्राप्त केलेल्या यादीमधून योग्य प्रगतशील शेतकऱ्यांची निवड विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने करावी.<br>इ) विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने निवडलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांच्या नावांची यादी जिल्हाधिकारी यांना पाठवावी. जिल्हाधिकारी यांनी सदर यादीस अंतिम मंजुरी देण्यात यावी. | दिनांक ०७.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ प्रगतशील शेतकरी निवडण्याची पध्दती खालीलप्रमाणे निश्चित केलेली आहे.<br>२. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये संबंधित विधानसभा क्षेत्रातील कोणत्याही ५ शेतक-यांचा समावेश करण्याची मुभा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचे अध्यक्ष म्हणून विधानसभा सदस्य यांना राहील. |
| ४ | परिशिष्ट क्र.१ (१.८) निविदा भरताना Performance security म्हणून प्रति | परिशिष्ट क्र.१ (१.८) निविदा भरताना Performance security म्हणून प्रति |

| | | |
|---|---|---|
| | कंत्राटदार रु.१५.०० लक्ष सुरक्षा ठेव घ्यावी व त्या दरात त्यांनी काम न केल्यास उपरोक्त कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे व सुरक्षा ठेव रक्कम सरकारजमा करावी. जिल्हास्तरीय समितीने अंतिम केलेल्या कंत्राटदाराच्या पॅनेलमधील कंत्राटदाराचीविधानसभा क्षेत्र स्तरीय समिती लॉटरी पध्दतीनेनिवड करेल. सदर कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रकमेच्या २ टक्के रक्कमकिंवा रु.१५.०० लक्ष यापैकी जी अधिक असेल ती रक्कम अनामत सुरक्षा ठेव (Security Deposit) घेण्यात यावी. | कंत्राटदार रु.१५.०० लक्ष सुरक्षा ठेव घ्यावी व त्या दरात त्यांनी काम न केल्यास उपरोक्त कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे व सुरक्षा ठेव रक्कम सरकारजमा करावी. जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता (Technical Qualification) व अंतिम केलेला प्रति तास दर (L१ rate) आधारभूत मानून सदर तांत्रिक अर्हतेस पात्र ठरणा-या इतर कंत्राटदारांची यादी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावी व जिल्हास्तरीय समितीने अंतिम केलेल्या प्रति तास दरामध्ये (L१ rate) काम करणा-या जास्तीत जास्त कंत्राटदारांचे पॅनेल विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावे. कंत्राटदाराच्या पॅनेलमधील कंत्राटदाराची विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती एकापेक्षा जास्त कंत्राटदारांना सारख्या प्रमाणात काम वाटप करु शकेल. सदर कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रकमेच्या २ टक्के रक्कम किंवा रु.१५.०० लक्ष यापैकी जी अधिक असेल ती रक्कम अनामत सुरक्षा ठेव (Security Deposit) घेण्यात यावी. |
| ५ | परिशिष्ट क्रमांक १<br>१.३ (अ) कंत्राटदाराकडे स्वमालकीची मशिनरी असावी की भाडेपट्टयाने घेतलेली असावी (Joint Venture) याबाबतचा निर्णय जिल्हास्तरीय समितीने घ्यावा. | परिशिष्ट क्रमांक १<br>१.३ (अ) पाणंद रस्त्याकरीता आवश्यक असणा-या यंत्रसामुग्रीची यादी शासन निर्णय दि.१४/१२/२०२५ मध्ये नमूद केलेली आहे. सदर यंत्रसामुग्री ही कंत्राटदाराच्या स्वमालकीची असावी. |

२. दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र.१२. महसूल यंत्रणेची जबाबदारी मध्ये पुढील उपमुद्दाचा समावेश करण्यात येत आहेः-

viii) दि. २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४३ अन्वये पारित आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची असेल.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२५१४४८५९६९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.03.25 14:50:42 +05'30'

**( प्रतापसिंह म. खरात )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३.आयुक्त, नरेगा नागपूर
१४.आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५.सर्व जिल्हाधिकारी.
१६.सर्व पोलीस अधिक्षक.
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

२०.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२३.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

२४.निवडनस्ती (पाणंद रस्ते)